**प्रेस नोट** ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.२६.०१.२०२३

आलोसे अनिल नारायण गायकवाड, वय–५०, ग्रामसेवक, गारखेडा–बाभळे ग्रुप ग्रामपंचायत, ता.धरणगाव,जि. जळगाव, रा.प्राथमीक आरोग्य केंद्राजवळ,चहार्डी,ता.चोपडा,जि.जळगाव यांना ३,०००/–रुपये लाचेची मागणी करुन २,५००/–रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्वीकारंताना ला.प्र.विभाग,जळगांव यांची कारवाई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव. |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | :– | धरणगांव पो.स्टे. गु.र.नं.३६/२०२३ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे. |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | अनिल नारायण गायकवाड, वय–५०, ग्रामसेवक, गारखेडा–बाभळे ग्रुप ग्रामपंचायत,ता.धरणगाव,जि.जळगाव, रा.प्राथमीक आरोग्य केंद्राजवळ, चहार्डी, ता.चोपडा, जि.जळगाव असे सांगितले. **(जिल्हा परिषद– वर्ग ३)** |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.२६/०१/२०२३<br>प्रथम ३०००/–रुपये व तडजोडीअंती २५००/– रु.लाचेची मागणी. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | २५००/–रुपये. |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.२६/०१/२०२३ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील तक्रारदार यांना सन २०१५ ते २०२२ या कालावधीमधील ग्रुप ग्रामपंचायत गारखेडा मार्फतीने करण्यात आलेल्या कामाचे ऑडीट रिपोर्ट मिळणेकामी ग्रुप ग्रामपंचायत गारखेडा येथे आलोसे यांचे कडेस दि.२९.१०.२०२२ रोजी माहिती अधिकार कायद्याखाली अर्ज केला होता. परंतु माहिती अधिकार कायद्यान्वये माहिती देण्याची मुदत संपुन देखील आलोसे यांनी तक्रारदार यांना माहिती दिली नाही.<br>दि.२५.०१.२०२३ रोजी तक्रारदार यांनी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवकयांना भेटुन माहितीचा अधिकार कायाद्यान्वये त्यांनी केलेल्या अर्जाची माहिती बाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांना "तुम्हाला जर लवकरात लवकर माहिती हवी असेल तर तुम्हाला मला ३,०००/– रुपये द्यावे लागतील" असे सांगुन लाच रकमेची मागणी केली.त्याबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो जळगाव कार्यालयाकडे दि.२६.०१.२०२३ रोजी लेखी तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव पथकाने दि. २६.०१.२०२३ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील नमुद आलोसे अनिल नारायण गायकवाड यांनी तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार कायाद्यान्वये मागणी केलेल्या ऑडीट रिपोर्टची माहिती देण्याचे मोबदल्यात पंचासमक्ष प्रथम ३,०००/– रुपये लाच रकमेची मागणी करुन तडजोडीअंती २,५००/– रुपये लाच रक्कम आलोसे यांनी धरणगांव अमळनेर रोडवरील सिंधु ढाबा येथे स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रमांक:–** 1064,**दुरध्वनी क्रमांक:–**0257-2235477

**व्हॉटसॲप क्रमांक:–** 8766412529

पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव सत्यमेव जयते

26.1.2023

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव